"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। कंटकेनेव कंटकम् ।।

मूल्य रु. ५


| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ | वर्ष : ३७ | एप्रिल -जून २०१५ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

ठाणे मंच - मुंबई मंच सहर्ष सादर करीत आहे

# ‘मनोरंजनाचा अनोखा कार्यक्रम’

**वेळ : शनिवार दिनांक ३० मे २०१५, सायं. ६.०० ते ९.००**

**स्थळ : कर्नाटक संघ सभागृह, माटुंगा (पश्चिम)**

१) फॅन्सी ड्रेस स्पर्धा : वयोगट १ ते १२

२) सोलो डान्स, जोडी डान्स, ग्रुप डान्स
३) वाद्य वादन
४) सुगम संगीत
५) नाटुकली (१० मिनिटे)
} वयाची अट नाही.

रसिका गायतोंडे : ९९६९७४४४०१ (सायंकाळी : ६.०० ते ९.००)    मंजिरी कुलकर्णी : ९६६५०९८११७

- वरील कार्यक्रमांत भाग घेणाऱ्यांचे कौतुक करण्यासाठी बक्षिसे द्यावयाची आहेत. हितचिंतकांनी प्रायोजन करण्यासाठी हातभार लावावा.
- ठाणे-मुलुंड मार्गे एक बस आयोजित करण्यांत येत आहे. ती बस ३.०० वाजता तीन हात नाका येथून निघेल व कार्यक्रम संपल्यावर त्याच मार्गाने परत येईल. इच्छुकांनी आपल्या नांवांची खालील व्यक्तींकडे नोंद करावी.

सुरेश पालेकर : ९९६९४५५३७०    राजू बोरकर : ९८२०९१७८४१

## एज्युकेशन सोसायटीच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक
## सोसायटीच्या सभासदांना सूचना

एज्युकेशन सोसायटीची कार्यकारिणी, निवडून आलेले एक अध्यक्ष, आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा अकरा सभासदांची असते. सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०१५ रोजी संपत आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०१५-२०१८ या तीन वर्षासाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयांतून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसह अर्ज पूर्ण करुन सोमवार दिनांक ३० एप्रिल २०१५, संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

# संपादकीय

## श्री गौडपादाचार्य संस्थान कवळें मठ, वालुकेश्वर
## प्रतिष्ठा सुवर्ण महोत्सव - २०१५-२०१६

आपल्यासारख्या समस्त कवळें मठानुयायी गौड सारस्वत ब्राह्मणांचे मुंबई येथील श्रध्दास्थान म्हणजे बाणगंगा, वालुकेश्वर येथील श्रीगौडपादाचार्य मठाधीशांचा कवळें मठ हा होय. हा मठ अंदाजे १६३० साली स्थापन करण्यात आला होता म्हणजे या मठाला जवळजवळ चारशे वर्षांची परंपरा आहे. मठामध्ये तीन मठाधीशांच्या समाध्या आहेत. या मठाची जुनी इमारत मोडकळीस आल्याने श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी यांनी नवीन वास्तूच्या बांधकामास प्रारंभ केला. त्यानुसार पुनर्बांधणीचा पायाभरणी शिलान्यास समारंभ काशीमठाधीश श्री. सुधीन्द्रतीर्थ स्वामीमहाराज यांच्या शुभहस्ते २८ फेब्रुवारी १९६३ रोजी संपन्न झाला. नंतर मे १९६५ मध्यें श्री शांतादुर्गा देवीच्या मूर्तीची प.पू. श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी यांच्या उपस्थितीत प्रतिष्ठापना करण्यात आली.

श्रीमूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या घटनेला यंदा पन्नास वर्षे पूर्ण होतात. म्हणून मठांत वर्षभर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजिण्यांत येत आहेत. या सोहळयाचा उद्‌घाटन समारंभ रविवार ३ मे रोजी साकार होणार आहे. त्याचा तपशील खाली चौकटीत दिलेला आहे. त्याशिवाय ३० मे ते १ जून या तीन दिवशी रोज सकाळी ९.०० वाजल्यापासून अनुक्रमे श्री गणेश याग, लघुरुद्र स्वाहाकार व पंचदुर्गा हवन ही अनुष्ठाने होतील. या सर्व कार्यक्रमांना मठाधीश श्रीमत् शिवानंद सरस्वती स्वामी उपस्थित राहणार आहेत.

१ एप्रिल २०१५ — द.ना.नाडकर्णी

---

**श्री गौडपादाचार्य कवळें मठ, वालुकेश्वर**
**प्रतिष्ठा सुवर्ण महोत्सव उद्‌घाटन समारंभ**

| | |
|---|---|
| दिनांक | : रविवार ३.५.२०१५ सायंकाळी : ५.३० |
| स्थळ | : बी. एन्. वैद्य सभागृह, हिंदू कॉलनी, दादर |
| कार्यक्रम | : संगीत रजनी, सुगम संगीत, भक्तीसंगीत वैगेरे |
| प्रवेशिका देगणी | : रु. ५०० हॉलवर व वालुकेश्वर मठ येथे उपलब्ध |

(संपर्क : रवी करंडे ९७७३०७५१२१)

**सर्व शिष्यगणांना हार्दिक निमंत्रण**

## एज्युकेशन सोसायटी - शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०१५ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जुलै २०१५ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील)
याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए. कॉस्टिंग, एन.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिस इ)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परदेशातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी :** गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करुन शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

# प्रकाशझोत

## 'श्री मंगेश महाजनांसाठी मार्गदर्शिका' एक वाचनीय व संग्राह्य ग्रंथ प्रकाशित

जानेवारी २०१४ च्या मुखपत्रिकेच्या अंकात श्री चंद्रनाथ विनायक शेणवी धुमे लिखित 'Guide for Shree Manguesh Mahajans' या इंग्रजी संदर्भ ग्रंथाविषयी माहिती दिली होती. या पुस्तकाचे वर शीर्षक दिल्याप्रमाणे मराठी रूपांतर करण्यांत आले आहे व त्याचे प्रकाशन श्री मंगेश देवस्थानांत माघ पौर्णिमेच्या रथोत्सवाच्या शुभदिनी करण्यांत आले. प्रत्येक जिज्ञासू यात्रेकरू नेहमी ज्या माहितीच्या प्रतीक्षेत असतो ती सर्व माहिती या ग्रंथात अंतर्भूत केलेली आहे. गोमंतकाचा व गौ. सा. ब्रा. ज्ञातीचा पूर्वेतिहास, कुलदैवतें व त्यांचे मूळ स्थानाहून सध्याच्या जागी स्थलांतर, पालवी देवता, महाजनांची यादी व त्यांचे गोत्र व पुरोहित, देवस्थानची नियमावली व व्यवस्थापन, महाजनांचे हक्क, कर्तव्य व आचरण, उत्सव व देवकृत्ये, प्रसाद कौल इत्यादी विविध विषयांवर सामान्य वाचकाला आकलन होईल अशा सुलभ भाषेत सांगोपांग माहिती या ग्रंथात एकत्रित केलेली आहे. आकर्षक जुने व नवे फोटो, वाहनांच्या, पालखींच्या व रथांच्या मार्गक्रमणाचे नावीन्यपूर्ण आराखडे, उत्कृष्ट छपाई यामुळे हे पुस्तक अत्यंत वाचनीय झालेले आहे. श्री मंगेशाच्या प्रत्येक कुळाव्यानें संदर्भग्रंथ म्हणून हे पुस्तक संग्रही ठेवण्यासारखे आहे.

(पृष्ठसंख्या : २०९, मूल्य रु. ३००)
(उपलब्ध : श्री मंगेश देवस्थान, द. ना. नाडकर्णी, पारले, २६१२४१६२
श्रीमती मृदुला भांडारकर, गिरगांव, ९३२२२३६२५७)

## 'X - FILES ...... के.ई.एमच्या' डॉ. मालिनी नाडकर्णी लिखित पुस्तकाचे प्रकाशन

माहीम येथील आमच्या मांगिरीशमध्ये राहणाऱ्या डॉ. सौ. मालिनी नाडकर्णी यांचे थोडक्यात वर्णन करावयाचे म्हणजे 'विद्या विनयेन शोभते' आणि 'मूर्ती लहान पण कीर्ती मोठी' असेच म्हणायला लागेल. पण त्यांच्यात इतके ठासून भरलेले गुण समजून यायला त्यांच्या 'X - FILES ...... के.ई.एमच्या' ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा योग यावा लागला. हे त्यांचे पुस्तक ११ जानेवारी २०१५ रोजी दादर माटुंगा कल्चरल सेंटर येथे ग्रंथालीतर्फे प्रकाशित झाले.

डॉ. मालिनी नाडकर्णी व्यवसायाने रेडियोलॉजिस्ट. जी. एस्. वैद्यकीय महाविद्यालय आणि K.E.M. रुग्णालय येथे प्रोफेसर व रेडियोलॉजी विभागप्रमुख. वाडिया रुग्णालयात रेडियॉलॉजी आणि सोनोलॉजी विभागप्रमुख, चेअर पर्सन, 'डिप्लोमा इन मेडिकल रेडियोग्राफ्री' ही सर्व पदे त्यांनी भूषविली आहेत. वैद्यकीय अध्यापन आणि व्यवसाय हे दोन्ही त्यांच्या कामाचे भाग आहेत पण ते करतांना त्यांनी कधीही पैसा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले नाही. K.E.M. मध्ये काम करतांना त्यांनी कष्टांना मागेपुढे पाहिले नाही. जुने रेडियोलॉजी डिपार्टमेंट, तिथल्या जुन्या मशिनरीना फाटा देऊन

'पाना आणि पाइप' या आयुधांपासून चुंबकी-संगणकी तंत्रांपर्यंतचं त्या विभागाचं स्थित्यंतर अनेक अडचणींचे डोंगर ओलांडून डॉ. मालिनीनी स्वत:च्या मेहनतीने केले, अनेक शिष्य घडवले ते सुध्दा अत्यंत लहान वयात न डगमगता, डोकं शांत ठेवून, कुठलाही गाजावाजा न करता. सगळ्यांशी नम्रतेने वागणाऱ्या, आपला बडेजाव न मिरवणाऱ्या मालिनीनी अनेक माणसं जोडली जी त्यांना अजूनही मानतात. K.E.M. चे रेडियोलॉजी डिपार्टमेंट अद्ययावत आणि संपन्न होण्याचं सर्व श्रेय डॉ. मालिनीना जातं. त्यांच्या धडपडीचा इतिहास 'एक्स-फाईल्स केईएमच्या' ह्या पुस्तकांत त्यांच्याच शब्दात वाचायला मिळतो. हे सर्व कार्य करतांना त्यांनी किती आव्हानाना, संकटांना तोंड दिलें ते पुस्तक वाचल्याशिवाय समजणार नाही. हे सर्व करताना त्यांनी संस्कृत आणि जर्मन भाषांचे कोर्सेसही केले. वारली पेंटिंग, चित्रकला ह्या कलापण शिकल्या. बाबा आमटेंच्या आनंदवनाला भेट देऊन आल्या. ह्या सर्वांत त्यांना त्यांचे पती डॉ. महेंद्र नाडकर्णी ह्यांची भक्कम साथ आहे. दोघंही अगदी आदर्श म्हणावेत असे पतीपत्नी आहेत. दोघांबद्दल लिहिण्यासारखे बरेच काही आहे, पण जागेअभावी शक्य नाही.

**सौ. शीला बर्डे, माहीम २४४५६७१९**

('X - FILES के.ई.एमच्या' मूल्य रु १२०, उपलब्ध ग्रंथाली २४३०६६२४, २४२१६०५०)

## प्रियांका गुंजीकर B-ARCH परीक्षेंत गुणवत्ता यादीत दुसरी

कारवार येथे 'गुंजीकर मास्तर' म्हणून सर्वांना परिचित असलेले कै. गणेश गुंजीकर, डे-डायरेक्टर, एज्युकेशन, महाराष्ट्र, यांची नात कु प्रियांका श्रीकांत गुंजीकर हिने एप्रिल २०१४ मध्ये झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या B-ARCH या परीक्षेत द्वितीय क्रमांक मिळविलेला आहे. शिक्षण क्रमाच्या अंतर्गत तिने सातारा जिल्हयातील किन्हई या खेड्यातील यादवकालीन पुरातन यमाई देवी साखरगड निवासिनी मंदिर याच्या जीर्णोध्दाराच्या प्रकल्पाचा अहवाल तयार केला होता. तो एवढा गाजला की त्याला युनेस्को एशिया पॅसिफीक तर्फे पुरस्कार मिळाला होता. पदवी परीक्षेच्या शेवटच्या वर्षी प्रियांकाने तिच्या आजोळचे गांव अवर्सा येथे मुक्काम ठोकून पारंपरिक वास्तुकला, उपकरणे व बांधकाम साहित्य यांचा उपयोग करुन पुनर्वसनासंबंधी वेगळया पध्दतीचे संशोधन केले होते हे विशेष.

## कु. आर्या सबनीस हिला 'डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक' स्पर्धेत सुवर्णपदक

'डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक' ही निवड स्पर्धा बृहन् मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे महाराष्ट्र राज्य पातळीवर भरविली जाते. ही स्पर्धा ६ वी व ९ वी वर्गांत शिकणाऱ्यांसाठी असते. २०१४-१५ या वर्षाच्या स्पर्धेला राज्यांतून ४५ हजार विद्यार्थी बसले होते. लेखी परीक्षा, प्रकल्प सादरीकरण व वैयक्तिक मुलाखत या तीन टप्प्यांत ही परीक्षा घेतली जाते.

'सविता सबनीस फाऊंडेशन' या नांवे संघाला सातत्याने देणगी देणारे एक हितचिंतक श्री. किशोर वासुदेव सबनीस यांची ११ वर्षाची नात कु. आर्या मोहन सबनीस ही ठाणे येथील सिंघानिया

शाळेची ६ व्या इयत्तेत शिकणारी विद्यार्थिनी. आर्याला यंदा वर नमूद केलेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळालेले आहे याबद्दल तिचे अभिनंदन. पूर्वी, चौथी इयत्तेत शिकण्याऱ्यांसाठी असलेल्या मिड्ल स्कूल स्कॉलर्शिप स्पर्धा २०१३, यातही गुणवत्ता यादींत ती महाराष्ट्रांतून ७ व्या क्रमाने उत्तीर्ण झाली होती.

## माणुसकीचा गहिंवर (एक अनुभव)

नवरात्रोत्सवासाठी मी व 'हे' गोव्याला कवळें येथे श्री शांतादुर्गा देवस्थान येथील खोलीमध्ये राहिलो होतो. पहिले दोन दिवस बरे गेले. तिसऱ्या दिवशी मला श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. त्यावेळी तेथे उत्सवासाठी आलेल्या श्री. प्रमोद गायतोंडे (माजी कमाविसदार) यांच्या खोलीवर डॉक्टरची चौकशी करायला गेले. मला होणारा त्रास बघून त्यांनी बऱ्याच जणांना फोन केले. तात्पुरता उपाय म्हणून एकाने सांगितलेली गोळी सौ. गायतोंडेंनी लगेच पाणी गरम करुन दिली. थोडा आराम पडला. पण सौ. गायतोंडे धावत देवळात गेल्या. मीही पाठोपाठ देवळात गेले. तिथे डॉ. श्रीधर कुलकर्णी सोवळ्यात होते. पण तशाही स्थितीत त्यांनी मला तपासले व गंभीर काही नाही, कफामुळे त्रास होतोय असे सांगितले. ते ऑर्थोपेडिक सर्जन असल्याने औषध देऊ शकत नव्हते. देवळातील माझी स्थिती बघून तिथे आलेले वांद्रयाचे डॉ. साखरदांडे आमची खोली शोधत आले व मला तपासून गोळया लिहून दिल्या. ह्यांनी फोंड्याला जाऊन गोळ्या आणल्या. तुम्हाला लगेच बरे वाटेल हे डॉक्टरचे शब्द खरे ठरले. तसेच तुम्ही दसऱ्याची पालखी बघूनच इथून जाणार हे ही त्यांचे शब्द खरे ठरले पण देवळातील व जेवणाच्या ठिकाणी येणाऱ्या बायका रोज माझ्या तब्येतीची चौकशी करत होत्या. तसेच जास्ती फिरु नका, आराम करा असा प्रेमाचा सल्ला देत होत्या. या सर्वांच्या मनातील माया, काळजी बघून मन भरुन आले.

या अनुभवावरुन एवढेच सांगावेसे वाटते की आजकाल डॉक्टर बद्दल उलट सुलट बोलले जाते, त्याला हा अनुभव अपवाद आहे. दोन्ही डॉक्टरनी खूपच मदत केली पैशाची अपेक्षा न ठेवता. डॉ. साखरदांडे तर खोली शोधत आले. आणखी काय पाहिजे ? तसेच हल्ली माणुसकी नाहिशी झालीय या म्हणण्यालाही हा अनुभव अपवाद आहे. कारण सर्वजण रोज आस्थेने माझी विचारपूस करत होते.

श्री शांतादुर्गा देवी, दोन्ही डॉक्टर्स व इतर सर्वांचे जाहीर आभार मानण्यासाठी हा लेखाचा प्रपंच.

**सौ. सुहासिनी अ. वर्टी, जोगेश्वरी**
(९१६७०६१८७५)

# ठाणे मंच सहल - २०१५

मध्यंतरी मला Whatsapp वर एक सुंदर मेसेज आला, "Alone I can smile, but together we can laugh, Alone I can enjoy but together we can celebrate, That's the beauty of human relationship." खरंच हेच togetherness celebrate करायला ठाणे मंच दरवर्षी सहल आयोजित करत असते. आणि लोकही मनापासून मजा करायला येत असतात व वर्षभरासाठी Recharge होतात.

तर या वर्षीची ठाणे मंचची सहल ११ जानेवारी रोजी, वसई येथील माऊंट व्ह्यु रिसॉर्ट मध्ये गेली होती. ठाणे मुलुंड वरुन एक व मुंबईहून दोन अशा ( विशेष म्हणजे जोगेश्वरीहून या वर्षी एक पूर्ण बस) तीन बसेस भरुन लोकं आली होती.

सालाबादाप्रमाणे श्री. पद्माकर तेलंग, श्री. प्रकाश वाघ, श्री. देवदास नाडकर्णी यानी विनोद व कविता सादर करुन लोकांचे मनोरंजन केले. श्री. सतीश वागळे यानी बासरीवर 'मोगरा फुलला,' 'चल उड जा पंछी' वगैरे गाण्यांची अतिशय सुरेल धून वाजविली. श्री. किरण दाभोळकर यांनी त्यांना तबल्यावर छान साथ केली.

रिसॉर्ट मधील पोहे, मेदुवडा, भुर्जी वगैरे नाश्ता, तसेच व्हेज, नॉनव्हेज जेवण अतिशय चविष्ठ होतेच, शिवाय त्यानंतरचे आईस्क्रिम व दुपारचे मधुर ताक व सर्वांत महत्वाचे म्हणजे संध्याकाळी परतायच्या वेळी चहाबरोबर बिस्किटाऐवजी मिळालेली गरमागरम कांदा भजी! सर्वच लय भारी! काय मंडळी, वाचूनच तोंडाला पाणी सुटले ना!

रिसॉर्ट मध्ये काही वेलींनी शाकारलेल्या पर्णकुट्या (खोपट्या) होत्या तिथे बसून काही जणांनी गप्पांचा आस्वाद घेतला तर काहींनी रिसोर्टवरील स्विमिंग पूल मध्ये पोहण्याचा आनंद घेतला. काहींनी नुसताच फेरफटका मारला. काही भाविकांनी वज्रेश्वरीच्या देवळाला गणेशपुरीला भेट दिली.

जेवणानंतर अगदी छोटया छोटया मुलांपासुन ते सर्वात ज्येष्ठ अशा तरुणांपर्यत सर्वांनी सांघिक खेळात भाग घेतला. शैलेश, रसिका, प्रसाद १, प्रसाद २, या सर्व गायतोंडेजनी खेळ आयोजित करण्याची जबाबदारी घेतली होती.

दरवर्षी हजेरी लावणाऱ्या डॉ. सदाकाका, शशिकांतकाका (नाडकर्णी) पद्माकरभावोजी (तेलंग), तारामावशी (गायतोंडे), अरविंदभाऊ (दिवेकर), दुर्गादासमामा (रेगे) यांसारख्या अनेक बुजुर्ग ज्येष्ठ तरुणांकडून आपल्याला एक प्रकारची Positive Energy मिळत असते.

या वर्षीची सहल मनापासून आवडल्याचे अनेकांनी कळविले व अशा सहली वर्षातून तीनचार वेळा करायच्या सूचनाही केल्या पण त्याचं काय आहे ना, My dear friends, you know overcharging can be harmful ! am i right? OR AM I RIGHT?

**मंजिरी कुलकर्णी, ठाणे**

## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/ प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफटमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारुन मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी अे टु झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या सुमारे ५० संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयल सारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरु करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करु तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरु करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करु. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी :** २६३०४५९९ / ९८१९३०४५९९

पत्रव्यवहाराचा पत्ता : पोस्ट बॉक्स ११९९०, आझाद नगर पोस्ट ऑफीस,

अंधेरी, मुंबई – ४०० ०५३.

SERVICE FIRST ®

9819304599 26304599

सर्वप्रथम सेवा ®

**SOCIETY SERVICE RESOURCE**

## आम्ही खरोखरच मूर्ख आणि बावळट होतो का ?

हा सवाल मला नेहमीच भेडसावत असतो व त्याचे पूर्णपणे समाधानकारक असे उत्तर मला अजूनही सापडलेले नाही.

Institute of Science मध्ये M.SC. with Pure Mathematics करताना आम्ही फक्त १२ विद्यार्थी होतो व त्यापैकी एकाचे नाव होते – गणेश पै. आमची कशी मैत्री झाली, इतकी घनिष्ठ कधी झाली हे कळलेच नाही. पण ही मैत्री अगदी घडाळ्याच्या काट्याप्रमाणे होती.

It is said :
Friendship in life should be like needles of clock,
No matter if one is faster or slower, Big or Small,
All it matters is to be connected with Each Other
आणि आमची दोस्ती अजूनही गेली पन्नास वर्षे अबाधित आहे.

१९७० साली, मी जेव्हा पनवेलला फॅक्टरी काढायचे ठरविले त्यावेळी गणेश होता – Sr. Regional Officer, Konkan Region, Directorate of Industries, Govt. of Maharashtra. अल्कोहॉल, स्टील आणि सिमेंटचा कोटा देणे सर्वस्वी त्याच्याच हातात होते. मी त्याला माझ्या फॅक्टरीप्लान बद्दल सांगितले आणि एक तासाच्या आत १००० टन सिमेंटचे परमिट माझ्या हातात आले. हजार टनापैकी मी फक्त ५५० टन सिमेंट वापरू शकलो व उरलेल्या ४५० टनाचे काय करावे याबद्दल बाजारात सहज चौकशी केली. ज्याप्रकारचा प्रतिसाद मला मिळाला त्याने मी पूर्णपणे हादरून गेलो. त्या काळात एका सिमेंटच्या ५० किलो बॅगची कायदेशीर किंमत फक्त रु. १२.५० होती पण मार्केटमध्ये एका बॅगला रु. ५३ मोजावे लागत. ते सुध्दा मिलावट असलेल्या सिमेंट करिता. शिवाय सिमेंटच्या अशा भयानक तुटवड्याने रेल्वे वॅगन्स नियमितपणे फोडल्या जात आणि सिमेंट चोरीला जात असे. माझ्या बाबतीत गणेशने, माझा सर्व कोटा मुंबईबाहेर असलेल्या ACC फॅक्टरीवर प्लॅन केला होता. त्यामुळे माझी ट्रक सिमेंट फॅक्टरीच्या आत जाऊन डिलीव्हरी घ्यायची व माझ्या माणसासोबत ती ट्रक सरळ पनवेलला दोन तासात येऊन माझ्या फॅक्टरीत रिकामी व्हायची. चोरीचा, मिलावटीचा, अफरातफरीचा काही प्रश्नच नव्हता. म्हणून लोक त्या ४५० टन सिमेंट बाकी असलेल्या परमिटला रु अडीच लाखापेक्षाही जास्त किंमत द्यायला तयार होते.

अडीच लाख रुपये म्हणजे त्या पैशात १९७० मध्ये मला पागडीवर South Bombay मध्ये ३००० sq. ft. चा अलिशान फ्लॅट मिळाला असता. भाडे फक्त रु. ३०० महिना with full protection under Maharashtra Rent Control Act. आज अशा फ्लॅटची किंमत १५ कोटीपेक्षाही जास्त आहे किंवा १९७० मध्ये अडीच लाखात माहीमच्या शांती को–ऑपरेटिव्ह मध्ये कमीत कमी ६ फ्लॅट्स तरी ओनरशीप बेसीसवर आले असते.

खरं सांगतो, ते परमिट अडीच लाखाला विकण्याचा मला मोह निश्चितच झाला होता. मी

सहज माझ्या बाबांकडे हा विषय काढला व आमचे खालीलप्रमाणे एक मिनिटाचे संभाषण झाले.

**हांव :** बाबा, माका या सिमेंट परमिटाचे अडीचलाखावैर दिवच्याक खूबजण तयार आसात. हांव किते करु ?

**बाबा :** गणेशान तुका परमिट दितना कितले पैशे घेतील्ले ?

**हांव :** ना बाबा ! एक पैसोसुध्दा घेतलो ना !

**बाबा :** तशे जाल्यार तुगेल्या जाग्यार हाव उरता आशिल्लो तर हांव ते परमिट सिमेंट कंट्रोलराक परत करता आशिल्लो.

दुसऱ्या दिवशी मी सरळ सिमेंट कंट्रोलरच्या ऑफीसमध्ये गेलो. सिमेंट कंट्रोलर म्हणाले "कसबेकरसाब आप इतनी जल्दबाजी मत करो. मैं आपको एक अच्छा दुसरा रास्ता बताता हूं. आप मुझे आधे घंटे में ××× हॉटेलमे मिलीये."

मी त्याला अगदी स्पष्टपणे सांगितले की, तो काय सांगणार ते मला माहित आहे व त्याकरिता मला त्याची गरज नाही. मी स्वत:च ते करु शकतो. पण मला तसे करायचे नाही व परमिट परत करायचेच आहे. बाहेर बसलेल्या सर्व स्टाफलाही आश्चर्य वाटत होते. मी व्यवस्थित कायद्याप्रमाणे परमिट परत देऊन कंट्रोलरच्या कॅबीनमधून बाहेर पडलो तेव्हा संपूर्ण स्टाफने उभे राहून उत्स्फूर्तपणे टाळया वाजवल्या. एकाने सांगितले की, हे पहिलेच परमिट जे कोणी या ऑफीसमध्ये परत केले आहे व कदाचित शेवटचेच ठरेल.

मला खरोखरच आश्चर्य वाटते की जेव्हा गणेशने मला हे परमिट दिले तेव्हा माझ्या मनात असा विचारही आला नव्हता की गणेश माझ्यावर काही मेहरबानी करत आहे आणि मला खात्री आहे की परमिट देताना गणेशच्या मनात सुध्दा असा विचार आलेला नसणार. खरेच आजकाल कृती तर सोडून द्या, विचारसरणीत सुध्दा किती बदल झालेला आहे. प्रत्येकजण फक्त स्वत:च्या फायद्याचाच विचार करतो मग ते कसा व कुठल्याही प्रकारे असे ना का.

आजही जेव्हा माझा हा अनुभव आजच्या तरुणपिढीला सांगतो तेव्हा ते असा चेहरा करतात की मला वाटते – जणू ते मला विचारत आहेत की– "तू, तुझे बाबा आणि तुझा मित्र गणेश पै इतके मूर्ख आणि बावळट कसे ? तुम्हाला जरा सुध्दा बिझीनेस ॲक्युमन नाही ?"

आम्ही खरोखरच असे मूर्ख आणि बावळट होतो का ?

सध्याचे आजुबाजूचे व्यवहार बघून कधीकधी असे वाटते की, मी मूर्खपणा केला. परमिट विकून मला रुपये अडीचलाख घ्यायला पाहिजे होते. 'शांती' तले सहा फॅलट भाडयाने देऊन सबंध आयुष्य अगदी मजेत काढता आले असते. पण अशावेळी आई शांतादुर्गेच्या कृपेने माझ्या दृष्टीसमोर हिन्दू हायस्कूलची वास्तु उभी राहते, माझ्यावर ऋषीतूल्य शिक्षकांनी केलेल्या संस्कारांची जाणीव होते

व माझ्या या सुदैवाबद्दल एका विलक्षण अभिमानाने माझा ऊर भरुन येतो त्याचवेळी मला त्या - "short lines with a million dollar meaning" आठवतात आणि मन शांत होते.

"The life that I am living now, is also a dream of millions!"
So appreciate it !

**अरुण भास्कर कसबेकर, चर्चगेट**
**९८२०२९१३६५**

## विवाह /वाङ्निश्चय


| | | |
|---|---|---|
| आदिती अजित बोरकर, सांताक्रुज | व | शौनक अनिल पै, पारले |
| महेश अनिल देसाई, बोरीवली | व | स्वाती नरेंद्रसिंग पाबळे, अंधेरी |
| राघवेन्द्र राजीव दिवेकर, पुणे | व | नेहा सुखवीर शर्मा, पुणे |
| रश्मी जयंत दुभाषी, टोरंटो | व | अमेय विश्वास नेरुरकर, सान होजे |
| सुजाता सुधीर कसबेकर, कडवाड | व | अनंत गोपाळकृष्ण भट, सुंकेरी |
| संकल्प सुभाष नाडकर्णी, कोपरखेरणे | व | स्वाती सुधाकर कामत, कोपरखेरणे |
| द्वयजा हेमानंद (मोहन) नाडकर्णी,अंधेरी | व | विशाल व्यंकटेश शानभाग, मुलुंड |
| विजयश्री दिलीप पालेकर, तळेगांव | व | अमेय सुभाष नेरुरकर, पारले |
| शकुन गौतम संजगिरी, माहीम | व | अमेय जे. कामत, चेंबूर |
| सौमिल सतीश वागळे, खार | व | कृत्तिका स्वामीनाथन्, बंगळूर |
| समीर मलंगप्रसाद वागळे, अंधेरी | व | मोशमी आचार्य, अंधेरी |
| कृपा प्रदीप वागळे, जोगेश्वरी | व | रूपेश रामकृष्ण कामत, अंकोला |

## SUBMISSIONS OF CENSUS FORMS

PERSONS WHO HAVE RECEIVED CENSUS FORMS POSTED ALREADY BY US ARE REQUESTED TO RETURN THE SAME, DULY FILLED, TO OUR OFFICE IMMEDIATELY TO ENABLE US TO PROCESS THE SAME. AS ABOUT 2100 FORMS ARE NOT YET RECEIVED, YOUR CO-OPERATION IN THIS REGARD WILL BE APPRECIATED.

**The N.K.G.S.B. Sangh / The N.K.G.S.B. EDU. Society**

हिन्दू हायस्कूलची स्वतःची वास्तू 'मंगेशप्रसाद' याच्या पायाभरणीची षष्ट्यब्दी
प्रवेशदाराजवळ असलेल्या कोनशिलेचा फोटो





रावबहादुर गणपतराव तेलंग यांच्या काजूबाग येथील वास्तूची शताब्दी

(तपशील पुढील पृष्टावर)

# वास्तूची विराणी

माझं माहेर कारवारचं. उच्च आणि उदात्त विचार-परंपरा जपलेलं, माझ्या उदारमतवादी आजोबांनी रावसाहेब गणपत शंकर तेलंग यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतलं आणि एक प्रामाणिक नि सत्यवादी वकील म्हणून लौकिक मिळवून स्वकर्तृत्वाच्या बळावर मोठी वास्तू उभी केली. मागे-पुढे प्रशस्त अंगण, समोर तुळशी वृंदावन आणि रंगीबेरंगी फुलांची बाग असलेलं हे दुमजली कौलारु घर येणाऱ्याजाणाऱ्यांच्या स्वागतासाठी बाहू पसरुन सदैव सज्ज असे. सकाळ झाली की या ना त्या कामानिमित्त लोकांची वर्दळ सुरु होई.

'अतिथी देवो भव' हेच या घराचं ब्रीद. कितीजण इथे येऊन रहात आणि जात, याला काही मर्यादाच नव्हती. खेडयापाडयातून इस्पितळांतील उपचारासाठी येणारे शेतकरीही आपल्या या जमिनदाराच्या घरी हक्काने येत. कौटुंबिक, आर्थिक विवंचनेत सापडलेल्यासाठी हे घर म्हणजे फार मोठं विश्वासाचं आश्रयस्थान होतं. तेवढयाच आस्थेने त्यांची सोयही केली जाई. रिकाम्या हाताने माघारी पाठवणं हे या घराच्या रीतिरिवाजात बसणारं नव्हतंच. मुंबईहून आलेली मित्रमंडळी हॉटेलमध्ये उतरल्याचं कळताच त्यांना मुक्कामास घरीच आणलं जाई. आपल्या घराचा बाहेरील लोकांकरिताही उपयोग झाला पाहिजे, अन्यथा ते घर कसलं असा आजोबांचा उदात्त दृष्टिकोन होता. पोर्तुगीज राजवटीत मॅट्रिकच्या परीक्षेसाठी मुंबईला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसंच अन्य कित्येक कुटुंबांचा येता-जाता आमच्याच घरी मुक्काम असे. सांगण्यास अभिमान वाटतो की काका कालेलकर, अ. का. प्रियोळकर, मनोहर सरदेसाई यांच्यासारख्या थोर साहित्यिकांचं वास्तव्य या घरात झालेलं आहे. बाकीबाबांचा पदस्पर्शही झालेला आहे. तात्पर्य, असं की, तिन्ही त्रिकाळ माणसांनी गजबजून जाणारं हे पाहुणचारलोलुप, आतिथ्यशील घर!

घराच्या समोरील अंगणात दोन आम्रवृक्ष दगडी गोलाकार कट्टयावर उभे. तीन पिढयांना आपल्या सुमधूर फळांनी तृप्त करत! परीक्षा जवळ आल्या की तासन्तास या आम्राच्या अंगा-खांद्यावर चढून किंवा शीतल छायेखाली सतरंजी पसरुन आम्हां बालगोपळांचं विद्यासंपादन चाले. लग्न-मुंजीच्या सोळयांत वधू-वर-बटूंना याच आम्रपुरुषाचे वरदहस्त लाभलेत आणि आठ वर्षांपूर्वी माझ्या आईवडिलांच्या विवाहाचा षष्ठ्यब्दीपूर्ती महोत्सव सर्व कारवारवासीयांच्या उपस्थितीत पार पाडला तोही याच आम्राच्या मांडवाखाली! आजोबांच्या कर्तृत्वाबद्दल आणि निरपेक्ष समाजसेवेबद्दल ब्रिटिश सरकारकडून त्यांचा रावसाहेब, रावबहादूर या पदव्यांनी झालेला गौरव, मान-सन्मान, त्यांचं यश कीर्ती-भरभराट-वैभव-लोकप्रियता, सगळया सगळयाचे साक्षीदार या वास्तूबरोबरच हे आम्रयोगीही आहेत.

पुढे एकेक सुकन्यांचे विवाह झाले. मुलगे उच्चशिक्षण, नोकरीसाठी मुंबईला रवाना झाले. निसर्गनियमानुसार वयोवृध्द काळाच्या पडद्याआड गेले. आमची तिसरी पिढी गोवा-मुंबई-कॅनडात स्थायिक, तर चौथ्या पिढीचे तेलंग घराण्याचे वारसदार परदेशांत स्थायिक आहेत. घरात दुसऱ्या

पिढीतील एकमेव उरली ती नव्वदीच्या घरात पोहलेली आमची आई! शेवटच्या श्वासांपर्यंत आपलं हे देवाधर्माचं घर न सोडण्याचा निर्धार केलेली! परंतु गेल्यावर्षी प्रकृती ढासळल्याने तिच्या मनाविरुध्द तिला मुंबईला न्यावं लागलं.

आणि हे घर निर्मनुष्य, एकाकी झालं. कधीन न पाहिलेलं बलदंड कुलूप दरवाजाने प्रथमच पाहिलं. मायेची पखरण थांबल्याने बागा उदासवाण्या झाल्या. तुळशीवृंदावनातील तुळस, हसरी फुलझाडं यांनी माना खाली टाकल्या. डुलणारे कल्पवृक्ष स्तब्ध झाले. पानांच्या सळसळीने गेटवरच आल्या-गेल्यांचं स्वागत करणारे आम्रयोगी मात्र कधीतरी केव्हातरी आपली माऊली परतेल या भक्कम आशेवर घराची राखण करत तटस्थ उभे आहेत. दया, क्षमा, शांती, परोपकार यांचे संस्कार झिरपलेल्या घरच्या चिऱ्याचिऱ्यांतून अश्रूंचा पाझर फुटत असेल. मानवी भावनांविना शुष्क झालेल्या घराच्या भिंती प्रेमाचा ओलावा शोधत असतील. श्री मंगेशाचं अस्तित्व नसलेला तो रिकामा देव्हारा, रोज केली जाणारी फुलांची सजावट, घंटानाद, धुपारती, पंचारती, पंचामृत, अभिषेक, अन्नाचा नैवेद्य अशा षोडशोपचार पूजेचा क्षुधार्त असेल. सत्याण्णव वर्षं माणसांच्या प्रेमळ उबेवर जगलेल्या या वास्तूची गात्रं आता पार थकून गेलीयत.

ज्यांनी तहहयात सत्याच्याच आधारावर आपल्या अशीलांना न्याय मिळवून दिला त्या दिवंगत रावबहाद्दूर गणपतराव तेलंगांची ही वास्तू मात्र आज वारसा हक्कासाठी कायद्याच्या विळख्यात सापडून न्यायासाठी गुदमरत आहे. या घुसमटीतून मुक्त करण्यासाठी ती आपल्या पिल्लांना टाहो फोडून आर्त साद घालत आहे... या चिमण्यांनो परत फिरा रे... पण ? ? ?

**मीरा तेलंग प्रभुवेर्लेकर, म्हापसा**

९४२०२४२३९६

(पूर्वप्रसिध्दी : 'महाराष्ट्र टाईम्स' १०.०४.२०११. वास्तूने गेल्यावर्षी शतक ओलांडले त्यानिमित्त पुनर्मुद्रण)

नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार

**"नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. वृत्तविलास" या त्रैमासिकाचे प्रकटन**

**FORM (IV) RULE 8**

१. **प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई -४.

२. **प्रकाशन अवधी :** त्रैमासिक

३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी, राष्ट्रीयत्व : भारतीय

**पत्ता :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई - ४.

४. **मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी.रोड, मुंबई - ४.

मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०१५** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** - प्रकाशक

## कारवार कोंकणी उत्सव - २०१५

कर्नाटक कोंकणी साहित्य अकादमी व करावळी कोंकणी समिती, यांच्या संयुक्त विद्यमाने कारवार येथे ७ व ८ फेब्रुवारी रोजी समुद्रा 'वेळे' वरील मयूर वर्मा रंगमंचावर 'करावळी कोंकणी उत्सव' मोठया धूम धडाक्यात संपन्न झाला. या उत्सवास मडगांवपासून मंगळूरपर्यंतच्या किनारपट्टीतील कोंकणी भाषिक रसिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी मालादेवीच्या प्रांगणांतून मिरवणूक काढण्यांत आली. त्यांत निरनिराळया भागांतून आलेल्या लोककला मंडळांच्या लोककलांचे पथप्रदर्शन झाले. सदर उत्सवाचे विशेष वैशिष्टय म्हणजे पं. भीमसेन जोशी यांचे प्रथितयश शिष्य पं. उपेन्द्रभट यांनी कोंकणी सुगम संगीत सादर केले. तसेच सदाशिवगड येथील 'सरस्वती संगीत कला केन्द्र' या शास्त्रीय संगीताला वाहिलेल्या संस्थेचे कार्यवाह व उत्कृष्ट गायक व कीर्तनकार श्री. दिनेश गडकर यांनी चार कोंकणी कविता स्वरबध्द करुन सुरेल आवाजांत सादर केल्या व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी गायलेल्या पहिल्या दोन कविता म्हणजे एन्.एम्. शानभाग यांच्या 'काव्यसंध्या' या कवितासंग्रहातील 'प्रणवसंस्तुति' व 'कर्मयोग' या होत्या नंतरच्या दोन कविता म्हणजे दिनकर देसाई रचित 'दिनकराली कवना' यातील 'कोंकणीभास' व 'मोग आनी मोगरे फूल' या होत्या.

या उत्सवाच्या अंतर्गत उत्तर व दक्षिण कानडा तसेंच गोमंतक येथील विविध लोककलांचे सुरम्य प्रदर्शन भरविण्यांत आले. उत्सवाच्या अनुषंगाने परिसंवाद, कवी संमेलन, पुस्तकप्रकाशन, निबंधस्पर्धा वगैरे कार्यक्रम आयोजित करण्यांत आले होते. तसेच कारवार जिल्हयांतील विविध क्षेत्रांतील २१ मान्यवरांचा (९ युवा व १२ प्रौढ) शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला त्यात दिनेश गडकर यांचाही समावेश होता.

हे दोन दिवस म्हणजे कारवार शहर खरोखरच कोंकणीमय होऊन गेले होते.

**(अरुण कुलकर्णी व दिनेश गडकर यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे)**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine India & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**


www.kccgoa.in
वीण विश्वासाची, सोबत निसर्गाच्या कुशीची
कुणाल कन्स्ट्रक्शन म्हणजे उत्तम बांधकाम, कल्पक वास्तुशास्त्र आणि सर्वोत्तम सुविधांची विश्वासार्हता. विश्वासाच्या याच विणीतून साकारलेल्या **गोव्यातील 'सुखसमृद्धी' संकूलात** आजच तुमची वास्तू पक्की करा आणि मग अनुभवा निसर्गाच्या कुशीत नटलेलं तुमचं समृद्ध संपन्न आयुष्य.
प्रदूषणविरहीत अशा वातावरणात राहून तुम्हाला अधिक संपन्न असं मानसिक आणि शारीरिक दीर्घायुष्य अनुभवता येईल यात काही शंकाच नाही.
सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर दीर्घायुष्याचं वरदान ठरेल हे नक्कीच.
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर, मंगेशी, फोंडा- गोवा
देखणा निसर्ग | प्रदूषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा
मंगेशीचा मंगेश, म्हार्दोळची म्हाळसा वेलिंगचा नृसिंह, मडकईची नवदुर्गा अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या सान्निध्यानं पवित्र झालेला परिसर.
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रूम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
प्रॉजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by: कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश कैरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: 2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## मुंबई मंचतर्फे कारवारी आनंदमेळावा

खाणं म्हणजे नुसतं उदरभरण नव्हे, तर तो रंग, रुप, रस, गंध, चव या सगळया संवेदना तृप्त करणारा अनुभव असतो. असाच कांहीसा प्रत्यय रविवार, २८ डिसेंबर २०१४ रोजी जोगेश्वरीतील के. जी. एस्. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणात संपन्न झालेल्या कारवारी आनंदमेळाव्याला उपस्थित असलेल्या खाद्यप्रेमींना आला.

सायंकाळी साडेपाच वाजल्यापासूनच सुरु झालेल्या खाद्ययात्रेला मिळालेला प्रतिसाद पाहता यंदाची गर्दी ही आजवरचा उच्चांक गाठणार यात शंकाच नव्हती. चिकन-वडे, कोलंबी भात, मोरीचे धबधबे, तिसऱ्याचे वडे, सुरमई-फ्राय अशा भारी 'आयटम' बरोबर सुकरुंडे, चवडे, तवसळी, उकडीचे मोदक असे चविष्ट पदार्थ सुशोभिततेने सजविलेल्या स्टॉल्सवरुन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. त्यातच बर्गर, नुडल्स, सॅंडविच, यांचीही भर पडल्याने खाद्यपदार्थांची रेलचेलच होती. ठाणे मंचने पेश केलेली 'कारवारी थाळी' हे यंदाचे आकर्षण. सुंगटाचे धबधबे, सुक्या सुंगटाची किस्मूर, 'शीत', डाळी-आमट व सोलाची तीवळ या कारवारमोळया 'मेनू'ने परिपूर्ण अशा थाळीने रसिकांना तोंडात बोटे घालावयास लावली, आश्चर्याने नव्हे तर चवीने चाटून खाण्यासाठी. या मेळाव्यात लोणची, मसाले, तयार कपडे, चादरी व ज्वेलरीच्या स्टॉल्सनाही चांगला प्रतिसाद लाभला. मेळाव्याच्या निमित्ताने नात्यातील व परिचयातील माणसे भेटत होती. असाच मेळावा दादर, माहीम, पारले येथेही आयोजित करण्याची मागणीवजा सूचना काहीजणांनी केली. आपल्या बॅंकेचे चेअरमन श्री. किशोर कुळकर्णी व सी.इ.ओ. श्री. चिंतामणी नाडकर्णी यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. संघाचे कार्याध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी यांनीही सर्व स्टॉल्सना भेट देऊन शुभेच्छा दिल्या. आर्थिक प्रायोजकत्व स्वीकारल्याबद्दल आपल्या जिव्हाळयाच्या बॅंकेचे, तसेच सोसायटीचे पटांगण उपलब्ध करुन दिल्याबद्दल के. जी.एस.कॉ-ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळाचे मुंबई मंचतर्फे आभार आणि उपस्थित खवय्यांना तसेच सर्व स्टॉलधारकांना हा आनंदमेळावा सफल केल्याबद्दल धन्यवाद. खरंच हा मेळावा म्हणजे कारवारकरांना आपलासा वाटणारा एक वार्षिक सोहळाच झालाय.

| स्टॉलधारक | खाद्यपदार्थ/ इतर जिन्नस |
|---|---|
| तारा गायतोंडे | तिसऱ्याचे वडे, सुकरुंडे, सुंगटाचे लोणचे, विविध मसाले |
| लता रामाणी | मोरी धबधबे, तवसळी, चवडे, रवा लाडू, नाचणी-सत्व |
| विनया नाडकर्णी | स्त्रियांचे कपडे |
| विद्या कसबेकर | मेथी भजी, उकडीचे मोदक, अळुवडी, चहा |
| प्रकाश गुडे | लाडू, शेव, चकली, लोणचे इत्यादी |
| | गृहोपयोगी उत्पादने |

| | |
|---|---|
| नीलिमा नाडकर्णी | मूग-गाठी, सुकी मासळी |
| वैशाली दळवी | कोलंबी-पुलाव, सुरमई व कोलंबी फ्राय, सोलकढी |
| निधी चव्हाण | स्त्रियांचे कपडे व पर्सेस |
| ठाणे मंच | कारवारी थाळी (सुंगटाचे धबधबे, सुक्या सुंगटाची किस्मूर, भात, आमटी, तीवळ इ.) |
| देवीदास शेणॉय | कोंबडी-वडे, शेव, चिवडा, इत्यादी |
| तन्वी नाडकर्णी | ज्वेलरी, पेपर प्रॉडक्टस् |
| वागळेज किचन | फिश-फ्राय, चिकन बर्गर, पचडी, नूडल्स्, कोलंबी, लोणचे इत्यादी |
| किशोर बोरकर/ आनंद कुलकर्णी | लिंबू व कोकम सरबत, मँगो पल्प |
| लक्ष्मी पै | लोणची, पापड, सांडगे वगैरे |
| राधिका कामत | ज्वेलरी, डिझाइनर साडया |
| शीतल मंत्री | चिकन मसाला, भाकरी |
| लक्ष्मी खांडेपारकर | चादरी, अभ्रे, इत्यादी गृहोपयोगी उत्पादने |
| आरती मुझुमदार | ज्वेलरी |
| कविता प्रभू (के.पी.इंटरनॅशनल) | विविध प्रकारचे मसाले |


**Shailesh Gaitonde**

**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

## FIRST DEATH ANNIVERSARY, 09TH APRIL 2015



**Mrs. Tejaswini S. Pikle B.A.**
**(19/01/1933 – 09/04/2014)**

## LADY BEHIND THE CURTAIN.

I was weak, I was naught. You were never distraught.
I was young, I was astray. You never let me sway.
You contribute to what I am. Without you I am sham.
Oh! Lady in the Absolute, Please accept my tribute.

Heavenly face, piercing green eyes, never-ending patience, ocean of compassion, professional cook, voracious reader and unfailingly kind. These words indeed fall miles short of the qualities of my beloved Grandmother Late Smt. Tejaswini S. Pikle (Ayi), a wonder woman who exalted the victories of each of my family and trifled our defeats.

Born to Smt. Radhabai R. Kamat and Dr. Raghavendra Kamat, a well-known physician of his time practising at Kalghatgi, Tejaswini was the third child. Her journey through life took her through various hardships, testing her zeal, tolerance, patience and adaptability to the worst outcome. From the dusty roads of the sleepy village of Kalghatgi, where she lost her elder sister and her father at a young age of 3 years, she moved on to Hubli, trudging with her mother. Staying in a chawl in Hubli for some time, she moved on to A.K. girls high school in Dharwad, where she was staying in the

hostel. It was the good gesture of Ms. Nadkarni, the then principal and warden of AK School to allow her and her mother to stay in the hostel, till they could find suitable accommodation in Dharwad. She then secured Bachelor of Arts degree from Karnataka College, Dharwad. Her everyday commuting to college and back by foot was an ordeal in itself. They found in Mr. G. B. Kulkarni, a godly man who gave them accommodation in Sadhankeri, Dharwad. She further completed her terms for M.A.

To elaborate her financial status, I would like to cite the following illustration. Their meagre source of income in those days was from the farm in Hattikeri, Ankola, for which her mother had to come once in two months to collect the revenue. Even taking rice and coconut to Dharwad was a difficult task. The city bus people would not take the luggage and hiring a Tonga was out of reach. Somehow they used to put the luggage underneath the seat and go to Sadhankeri bearing the words of the conductor, who was an authority in himself. Such was her struggle for with nobody to fall back on except her mother.

Finally in 1957 Mrs. Radhabai Kamat and Mr. Katti, the then forest official in Karwar met Dr. S. R. Pikle with a view of matrimony for Tejaswini. The final knot was tied on 20th June in town municipal hall, Karwar. Thereafter they were blessed with 3 sons and a daughter, all of whom are un-assessably wealthy in matters of culture, tradition and manners. It won't be wrong if I were to say that they inherited it from Ayi. Her choices in selection of the son and daughters- in-law has made the Pikle family gain a lot of respect. She adored our home and every visitor would be pleased to have a rapport with Ayi.

A walking dictionary of Kannada: that is my Ayi. In the formative years she helped not only me, but all my siblings with Kannada. She fascinated us with wonderful stories and helped us grapple efficiently all the academic burden. She struck all of us with arrows of humility, gentleness, curiosity etc. if continued I am sure that the list won't end.

Having her around meant our life was not ordinary, it was a merry of whimsical happenings. She helped us exploit every single capability of ours. She was a perfectly dependable shore in the rough tide of life. At her passing away, we lost a precious treasure never to regain again. We all terribly miss her and do pray that she attains eternal peace.

**Anurag S. Pikle, on behalf of the Pikle family, Karwar.**
**Ph. No. 9731631701**

## ज्येष्ठ कवियत्री सरिता पदकी यांचे निधन

'सत्यकथा' या दर्जेदार मासिकाचे लेखक म्हणून नांव मिळविलेले सुप्रसिध्द साहित्यिक, अर्थशास्त्राच्या क्षेत्रांत दबदबा असलेले व कारवारच्या हिंदू हायस्कूलचे विद्यार्थी कै. मंगेश पदकी यांच्या पत्नी सरिता पदकी यांचे अलीकडेच वृध्दापकाळाने अमेरिकेत निधन झाले. संस्कृत विषयांत एम्. ए. पदवी संपादन केल्यावर त्यांनी काही वर्षे डेक्कन कॉलेज येथे कोश विभागांत संशोधन केले व नंतर फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्यांनी संस्कृत विषयाचे अध्यापन केले. कथा, कविता, नाटक, अनुवाद असे विविध प्रकारचे लेखन त्यांनी केलेले आहे. बालवाङ्मयासाठी त्यांचे योगदान जास्त लक्षणीय आहे. 'गुटर्र गूं गुटर्र गूं' आणि 'नाच पोरी नाच' हे त्यांच्या बालकवितांचे संग्रह व 'जंमत टंपूटिल्लीची' हा कथासंग्रह हे विशेष गाजलेले आहेत.

## निधन

| | | |
|---|---|---|
| प्रदीप (पॅटी) यशवंत कसबेकर | (कडवाड) | पुणे |
| विमल पुरुषोत्तम (धुंडा) कसबेकर | (कडवाड) | अमेरिका |
| निर्मला दुर्गाप्रसाद कसबेकर | (खारगे) | पुणे |
| विजय दिनकर कुलकर्णी | (किन्नर) | कुलाबा |
| प्रवीण दिनकर मुझुमदार | (अंकोला) | पुणे |
| भावना नंदकुमार नाडकर्णी | (अंकोला) | गोवा |
| सुलभा सुरेश नाडकर्णी | (अगळी) | पुणे |
| मालती माधव नाडकर्णी | (सांवरपै) | गोरेगांव |
| प्रमोद मंगेश नाडकर्णी | (अंकोला) | कल्याण |
| सरिता मंगेश पदकी | (कारवार) | पुणे |
| लक्ष्मी (सुमती) नारायण (मधु) पालेकर | (तोडूर) | माहीम |
| ज्योती पांडुरंग (किरण) पालेकर | (तोडूर) | पुणे |
| उषा बाळकृष्ण संझगिरी | (गांवगेरी) | दादर |
| प्रमिला मंगेश (गुणा) तेलंग | (केरवडी) | माहीम |
| हीरा दत्ताराम तेलंग | (केरवडी) | माहीम |
| रामकृष्ण (उदय) शंकर तेलंग | (बाड) | अंधेरी |
| *कमलाकर कृष्णराव वाघ | (सदाशिवगड) | पुणे |
| विमला अनंत वाघ | (सदाशिवगड) | अंधेरी |
| अनसूया शिवानंद वाघ | (हारवाडे) | पुणे |
| शीला मोहन वागळे | (बाड) | माहीम |
| जिवाजी कृष्ण वागळे | (बाड) | दादर |
| सत्यजित विठ्ठल (नरु) वर्टी | (सदाशिवगड) | आस्ट्रेलिया |

*(कमलाकर वाघ यांनी देहदान केलेले आहे.)

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

### कै. पुटप्पा व कै. अरविंद नाडकर्णी पितापुत्रांच्या स्मरणार्थ अमृतमहोत्सव निधीसाठी आणखी दोन कोटी रुपयांची देणगी

कै. पुटप्पा शिवराम नाडकर्णी व त्यांचे सुपुत्र कै. अरविंद नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कै अरविंद यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती स्नेहलता यांनी संघाच्या अमृत महोत्सवनिधीसाठी एक कोटी रुपयांची विक्रमी देणगी दिली होती याचा उल्लेख मागे मुखपत्रिकेत आला आहे. अलीकडे स्नेहलता बाईंनी त्यात आणखी दोन कोटी रुपयांची भर घातलेली आहे.

### अनामिकेकडून वृध्दसेवानिधीसाठी १ लाख ५५ हजार रुपयांची देणगी

संघाच्या एक महिला हितचिंतक यांनी अलीकडेच आपले नांव प्रसिध्द न करण्याच्या अटीवर संघाच्या वृध्दसेवानिधीसाठी १ लाख ५५ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

### श्री. प्रभाकर (पबी) कुलकर्णी यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला दहा लाख रुपयांची देणगी

श्री. प्रभाकर (पबी) दुर्गाराम कुलकर्णी हे सिव्हील इंजिनीयरींगमधले पदवीधर. त्यांनी जर्मनीमध्ये पदव्युत्तर शिक्षणही घेतलेले आहे. तांत्रिक विषयाच्या अध्यापनामध्ये त्यांचे विशेष प्रावीण्य आहे. तांत्रिक शिक्षण सल्लागार म्हणून युनेस्कोतर्फे बंगलादेश येथे त्यांची नेमणूक झाली होती. सध्या ते पुण्यात स्थायिक झालेले आहेत. त्यांच्या पत्नी सुनंदा यांचे गेल्या वर्षी निधन झाले. श्री. कुलकर्णी यांनी अलीकडेच पत्नीच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला दहा लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### कु. पुष्पा वागळे यांजकडून वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण गणपत वागळे हे मूळचे माजाळी गांवचे . त्यांची कन्या कु. पुष्पा वागळे या सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे राहतात. त्यांनी अलीकडेच आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती रमाबाई सोहोनी यांच्या स्मरणार्थ संघाला एक लाख रुपयांची देणगी

दादर येथे राहणाऱ्या श्रीमती रमाबाई (सिंधू) भास्कर (आरोम) सोहोनी यांचे गेल्या वर्षी निधन झाले. त्यांना संघाला देणगी देण्याची फार इच्छा होती. ती इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या मुलामुलींनी अलीकडेच संघाच्या समाजसेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्रीमती मालती नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वैद्यकीयसेवानिधीसाठी ५०,००१ रुपयांची देणगी

गेल्या पिढींत कारवार येथे सर्वांना परिचित असलेले कै. रामकृष्ण (बाबुटमाम) त्रिंबक नाडकर्णी यांचे चिरंजीव श्री. माधव वास्तव्याला गोरेगांव येथे असतात. माधवरावांच्य पत्नी मालती यांचे नुकतेच जानेवारी महिन्यांत दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे चिरंजीव डॉ. मोहन नाडकर्णी यांनी वैद्यकीय निधीसाठी संघाला ५०,००१ रुपयांची देणगी दिलेली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती कमलाबाई व श्री. जयवंत ऊर्फ दुर्गा देविमनी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मंगेश यांजकडून | १०,००० |
| २. | विवाहाच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी श्रीमती शीला व श्री. नागेश (परेश) बाळकृष्ण बर्डे यांजकडून. | ५,००० |
| ३. | एन. के. जी. एस. बी. को ऑप बँकेकडून | ४०,००० |
| ४. | श्रीमती रमाबाई भास्कर सोहोनी यांच्या इच्छेनुसार त्यांच्या मुलांकडून | १,००,००० |
| ५. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ४ थ्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,००१ |
| ६. | वडील श्री. वसंत मंगेश दुभाषी व आत्या श्रीमती कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ मुलांकडून | २०,००० |
| ७. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | ५,००० |
| ८. | श्री. सर्वोत्तम शांताराम कुलकर्णी यांच्या ११० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्येकडून | १,५०० |
| ९. | प.पू. कैवल्यपूर मठाधिपती श्री. शिवानंद सरस्वती स्वामी महाराज यांजकडून संस्कृत पाठांतर स्पर्धेसाठी | ५,००० |
| १०. | श्रीमती तेजस्विनी श्रीपाद पिकळे यांच्या स्मरणार्थ पती डॉ. श्रीपाद रामचंद्र पिकळे यांजकडून | ५,००० |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | अनामिकेकडून | १,५५,००० |
| २. | श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण गणपत वागळे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती पुष्पा नारायण वागळे यांजकडून | १,००,००० |
| ३. | श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी शिवराव वाघ, श्री. रामकृष्ण शिवराव वाघ व | २,५०० |

श्रीमती स्नेहलता गोपीनाथ वाघ यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ यांच्या मुलांकडून

४. श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग, श्रीमती शकुंतला व श्री. त्रिंबक महाबळेश्वर तेलंग यांच्या स्मरणार्थ श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग यांच्या नातवंडांकडून — २,०००

५. श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी शिवराव वाघ श्री. रामकृष्ण शिवराव वाघ व श्रीमती स्नेहलता गोपीनाथ वाघ यांच्या स्मरणार्थ सर्वश्री अविनाश व सुधीर रामकृष्ण वाघ यांजकडून — २,५००

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

१. श्रीमती मालती माधव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. मोहन यांजकडून — ५०,००१

## अमृत महोत्सव निधीसाठी

१. श्री. पुटप्पा शिवराम नाडकर्णी व श्री. अरविंद पु. नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ अनुक्रमे स्नुषा व पत्नी श्रीमती स्नेहलता अ.नाडकर्णी यांजकडून — २,००,००,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. श्रीमती पद्मजा मधुसूदन सीनकर (पूर्वाश्रमीची मालिनी गजानन वागळे, माजाळी) यांच्या स्मरणार्थ पती डॉ. मधुसूदन मोरेश्वर सीनकर यांजकडून — १०,०००

२. श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीपती कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. महारुद यांजकडून — १०,०००

३. एन. के. जी. एस. बी. को ऑप बँकेकडून २०१४-१५ साठी — १०,०००

४. श्री. रोहन प्रमोद आरस यांजकडून (बक्षिसाची रक्कम कृतज्ञतापूर्वक) — ३,१६०

५. श्रीमती सुनंदा प्रभाकर कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पती श्री. प्रभाकर दुर्गाराम कुलकर्णी यांजकडून — १०,००,०००

६. श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ४ थ्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून — १,००१

७. श्री. सर्वोत्तम शांताराम कुलकर्णी यांच्या ११० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्येकडून — १,५००

८. श्रीमती अंबिका व श्री रुद्रा गोविंद वाघ यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. महेश्वर यांजकडून — २,५०१

९. श्री. मोहन रामचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा, कन्या श्रीमती वंदना मोंडकर व नातु श्री. वरद विलास मोंडकर यांजकडून ५,०००

*१०.सविता सबनीस फाऊंडेशनकडून

श्रीमती सविता किशोर सबनीस यांच्या स्मरणार्थ २,५०१

श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री वासुदेव गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ २,५०१

(* गेल्या अंकातील तपशीलासंबंधी दुरुस्ती)

## ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ - पुणे शाखा उद्घाटन

सदर मंडळाची पुणे शाखा अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहुर्तावर मंगळवार २१ एप्रिलपासून कार्यरत होत आहे. इच्छुकानी त्याचा लाभ घ्यावा संपर्क :

**सौ. दीपा दीपक सराफ (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा (प्रभा) विश्वनाथ तेलंग)**

९९२३६०८०६८ (सकाळी १० ते १२)

३७ एफ, श्रीरामनगर, परिहार चौक, औंध, पुणे ७

**जोगेश्वरी शाखा - आवाहन**

जोगेश्वरी शाखेच्या श्रीमती तारा गायतोंडे यांनी वैयक्तिक कारणासाठी मंडळाचे काम यापुढे चालविण्याची असमर्थता व्यक्त केली आहे. मुंबई पश्चिम उपनगरांत ज्यांना हे सेवाकार्य करण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया संपर्क साधावा.

**सुरेश पालेकर : ९९६९४५५३७०** **मंजिरी कुलकर्णी : ९८२०९१७८४१**


**MIPL**

**MANGSIDHESH INVESTMENT PVT. LTD.**

| | | |
|---|---|---|
| Financial Advisors | Equity Trading | Public |
| Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim |
| Postal Schemes | | |

**Corporate Office**

Bldg. No. 1, Flat No. 1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.

Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80


# Bank is now Authorized Dealer (AD 1) in Forex



## YOU CAN OPEN NRE / NRO ACCOUNT AT ANY BRANCH

**NKGSB Bank**

NKGSB Co-op. Bank Ltd.

SINCE 1917

Regd. Office: Laxmi Sadan, 361, V.P. Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Email: customercare@nkgsb-bank.com | Web: www.nkgsb-bank.com | Customer Care No.: 022 2860 2000


हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.